# Board of College and University Development
# University of Pune.
# Schedule for Central Audit.

जा. क्र. ओ.एस.डी./बी.सी.यु.डी./१४९ दिनांकः—२८/०३/२०१२

प्रति
मा. प्राचार्य /मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालये
व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था.

विषय : संशोधन प्रकल्प योजना (Research Project Scheme)

महोदय,

पुणे विद्यापीठाच्या सर्व संलग्न महाविद्यालयामध्ये व मान्यता प्राप्त संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २००९—२०१०, मध्ये अनुदान प्राप्त संशोधन प्रकल्पांचे अंतिम एकूण हिशेब तपासणीसाठी केंद्रिय पध्दतीने लेखे स्विकारण्यासाठी जिल्हानिहाय शिबीर बोलविण्यात येत आहे. सन २००९—२०१०मध्ये अनुदान प्राप्त संशोधन प्रकल्पांचा ज्या संशोधन प्राध्यपकांनी पहिला हप्ताच घेतला आहे. त्यांनीही उर्वरित हप्त्यांच्या खर्चासह एकूण खर्चाचा हिशेब सादर करावा.

तरी संलग्न महाविद्यालयातील शैक्षणिक व संशोधन समन्वयक यांनी दिलेल्या तारखांप्रमाणे उपस्थित राहावे.

| अ. नं | जिल्हा | ठिकाण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | नशिक शहर व ग्रामीण | सेट गेस्ट हाऊस, पुणे विद्यापीठ, पुणे. | ०९/०४/२०१२ | स. १०.०० ते दु. ५०० |
| २. | अहमदनगर शहर व ग्रामीण | सेट गेस्ट हाऊस, पुणे विद्यापीठ, पुणे | १०/०४/२०१२ | |
| ३. | पुणे ग्रामीण | सेट गेस्ट हाऊस, पुणे विद्यापीठ, पुणे | ११/०४/२०१२ | |
| ४. | पुणे शहर | सेट गेस्ट हाऊस, पुणे विद्यापीठ, पुणे | १२/०४/२०१२ | |
| ५. | पुणे शहर | सेट गेस्ट हाऊस, पुणे विद्यापीठ, पुणे | १३/०४/२०१२ | |

सोबत सन २००९—२०१० हया कालावधीतील प्रकल्प मान्यता पत्र व प्रत्यक्षात अनुदान मिळाल्याचा चेक नंबर व रक्कम रूपये, लेखा प्रमाणपत्र (Audit Statement), मुळ देयके, Innovation – 2012 चे प्रमाणपत्र आणणे आवश्यक आहे. एकूण हिशोब सनदी लेखा पाल (Chartered Accountant) यांच्याकडून तपासून लेखा प्रमाणपत्रसह सादर करावा. उपकरणे, साधने यांची Stock entry, पुस्तकांच्या ग्रंथालयातील नोंदीचा पुरावा व सर्व कागदपत्रांवर मा. प्राचार्यांची सही आवश्यक आहे. तसेच सन, २००९—२०१० मध्ये अनुदान प्राप्त संशोधन प्राध्यापकांनी त्यांच्या संशोधन प्रकल्पांच्या अहवालाची (Research Project Report) ची एक प्रत Hard Bound Copy With Embossing स्वरूपात व एक Soft Copy जमा करणे आवश्यक आहे.

या नंतर पुन्हा २००९–२०१०मध्ये मान्यता मिळालेल्या संशोधन प्रकल्पांच्या हिशोब तपासणीसाठी केंद्रिय पध्दतीने लेखे शिबीर आयोजित केले जाणार नाही.

सदर संशोधन प्रकल्प व त्यावरील खर्चाचे हिशोब केंद्रीय लेखे शिबीरा दरम्यान जमा न झाल्यास सन २०१२ – २०१३ मध्ये दिल्या जाणाऱ्या नविन संशोधन प्रकल्पांच्या अनुदानास पात्र राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,



डॉ. रविंद्र जायभाये

विशेष कार्याधिकारी, म.वि.वि.मं.